MAHARASHTRA TOURISM

# महाराष्ट्र:

# एक अनोखं जग

पर्यटन संचालनालय, पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन


जून २०२६ / अंक ६



माळशेज घाट



आंबोली



कोयनानगर

## महाराष्ट्रातील विशेष उपक्रमांचा आढावा

जून 2026 मध्ये महाराष्ट्रामधील आध्यात्मिक व वारसा पर्यटन स्थळे ते नैसर्गिक सौंदर्यांनी नटलेल्या विविध प्रेक्षणीय स्थळांचे दर्शन घडले. शिर्डीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'जागतिक आध्यात्मिक पर्यटन परिषद'ने राज्याचे आध्यात्मिक पर्यटनामधील वाढते महत्त्व अधोरेखित केले. तसेच अजिंठा-वेरूळ लेणी आणि नाशिक वाईन कंट्री लूपला विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बैठका, प्रोत्साहने, परिषदा आणि प्रदर्शने (MICE) क्षेत्रातील धोरणात्मक उपक्रम, पर्यटन क्षेत्रामधील पायाभूत सुविधा आणि गुंतवणूकीला प्रोत्साहन देण्यात आले. पावसाच्या आगमनाने राज्यभरातील पर्यटन स्थळांचे सौंदर्य आणखीनच खुलले आहे. महाराष्ट्र राज्य देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पर्यटकांना एक अनोखा आणि सुखद अनुभव देत आहे.

# • महाराष्ट्रातील विशेष उपक्रमांचा आढावा

## 'जागतिक आध्यात्मिक पर्यटन परिषद'चे यशस्वी आयोजन

पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीद्वारे (PHDCCI), केंद्रीय पर्यटन मंत्रालय, महाराष्ट्र पर्यटन विभाग, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी यांच्या सहकार्याने 12 आणि 13 जून 2026 रोजी श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी येथील सभागृहामध्ये रुहmantic: पीएचडीसीसीआयच्या तिसऱ्या जागतिक आध्यात्मिक पर्यटन परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

देशभरात झपाट्याने वाढणाऱ्या आध्यात्मिक पर्यटन क्षेत्राच्या भविष्यावर चर्चा करण्यासाठी या परिषदेमध्ये वरिष्ठ धोरणकर्ते, पर्यटन क्षेत्रातील दिग्गज, मंदिर व्यवस्थापक, आदरातिथ्य क्षेत्रातील भागधारक, प्रवास नियोजक, पर्यटन संस्था आणि आध्यात्मिक संस्था एकाच मंचावर एकत्रित आल्या. सदर परिषदेद्वारे नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील सिंहस्थ कुंभमेळा 2027-28 वर विशेष भर देण्यात आला.



## पर्यटनात महाराष्ट्र अव्वल; अजिंठा-वेरूळ लेणी आणि नाशिकचा सन्मान



'इंडिया टुडे टुरिझम समिट अँड अवॉर्ड्स 2026' मध्ये अजिंठा-वेरूळ लेण्यांना 'रीडर्स चॉइस अवॉर्ड' (हेरिटेज डेस्टिनेशन) आणि नाशिक वाईन कंट्री लूपला 'एडिटर्स चॉइस अवॉर्ड' (इंडियन रूट्स) पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा बहुमूल्य सन्मान महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या वतीने पर्यटन संचालनालयाचे सह-संचालक श्री. संतोष जाधव आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक श्री. चंद्रशेखर जयस्वाल यांनी स्वीकारला. हा पुरस्कार केंद्रीय पर्यटन मंत्री श्री. गजेंद्र सिंह शेखावत आणि गोव्याचे मुख्यमंत्री श्री. प्रमोद सावंत यांच्या हस्ते, तसेच श्री. अरुण पुरी आणि श्री. राज चेंगप्पा यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. महाराष्ट्राच्या समृद्ध वारशाचा आणि पर्यटन क्षेत्रातील उत्कृष्टतेचा हा अभिमानास्पद असा गौरवशाली सन्मान आहे.

## • आगामी कार्यक्रम

### विठू माऊलीच्या गजरात आषाढी वारी



महाराष्ट्र ही संतांची आणि अखंड भक्तीने पावन झालेली भूमी आहे. या भूमीच्या परंपरेचा आणि अध्यात्माचा सर्वात मोठा उत्सव म्हणजे पंढरपूरची आषाढी वारी. दरवर्षी ज्येष्ठ आणि आषाढ महिन्यात अवघा महाराष्ट्र विठ्ठलमय वातावरणामध्ये दंग होऊन जातो. मानवी भावना, शिस्त, भक्ती आणि निसर्गाचे मोहून टाकणारे रूप वारीमध्ये अनुभवायला मिळते. दरवर्षी आषाढी वारीच्यानिमित्ताने लाखो वारकरी विठुरायाचे नामस्मरण करत शेकडो किलोमीटरची पायपीट करतात.

वारीदरम्यान होणारे रिंगण, जुन्या मुंबई-पुणे मार्गावरून आणि सासवडच्या दिवे घाटातील वारीचा प्रवास स्वर्ग सुखाचा अनुभव देते. विठ्ठल नामाच्या गजरात स्वतःला विसरून जाणारे वारकरी, भारतीय अध्यात्म, लोकसंस्कृती आणि संत परंपरा जवळून अनुभवण्यासाठी देश-विदेशातील पर्यटक, अभ्यासकही वारीमध्ये सहभागी होतात. चला तर मग, या आषाढी वारीच्या निमित्ताने तुम्हीही या भक्तीच्या महासागरात सहभागी व्हा.

## • महत्त्वाच्या बातम्या

### जागतिक माईस (MICE) बाजारात महाराष्ट्राची झेप


महाराष्ट्र पर्यटन विभागाने महाराष्ट्र कन्व्हेन्शन ब्युरो (MCB) आणि बैठका, प्रोत्साहनपर दौरे, परिषदा, प्रदर्शने (MICE) क्षेत्रातील अग्रगण्य कंपन्यांपैकी एक जोचेन विट कन्सल्टिंग (JWC GmbH) यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला असल्याची घोषणा केली. पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव श्री. संजय खंदारे (भा.प्र.से.), उप सचिव श्री. विजय पोवार, जोचेन विट कन्सल्टिंग कंपनीचे अध्यक्ष आणि भागीदार श्री. जोचेन विट, जोचेन विट कन्सल्टिंग कंपनीचे भागीदार श्री. सेबॅस्टियन विट आणि जोचेन विट कन्सल्टिंग कंपनीचे (भारत आणि दक्षिण-पूर्व आशिया) चे कार्यकारी संचालक श्री. विजय शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. राज्याला व्यावसायिक कार्यक्रमांसाठी जागतिक स्तरावर ओळख मिळावी म्हणून हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

राज्याला माईस (MICE) क्षेत्रासाठी प्रमुख केंद्र म्हणून प्रस्थापित करण्याच्या धोरणात्मक उद्देशाने पर्यटन विभागाने 'महाराष्ट्र कन्व्हेन्शन ब्युरो'ची स्थापना केली आहे. मुंबईसह महाराष्ट्रातील इतर महत्त्वाच्या शहरांमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदा, प्रदर्शने आणि व्यावसायिक कार्यक्रमांना आकर्षित करणे, आणि त्याद्वारे जागतिक माईस (MICE) क्षेत्रामध्ये राज्याचे स्थान बळकट करणे हा या ब्युरोचा मुख्य हेतू आहे.



• **महत्त्वाच्या बातम्या**

## पर्यटकांना अनुभवता येणार समुद्रतळाची सफर





सिंधुदुर्गच्या समुद्रतळातील विहंगम दृश्य पर्यटकांना लवकरच प्रत्यक्ष डोळ्यांनी अनुभवता येणार आहे. पर्यटकांना थेट समुद्रतळापर्यंत घेऊन जाण्यासाठी देशातील पहिल्या पर्यटन पाणबुडीच्या उभारणीस माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेडमध्ये (एमडीएल) सुरुवात झाली आहे. 2027 अखेरपर्यंत ही 24 आसनी पाणबुडी विकसित करण्याचे उद्दिष्ट असून, तिच्या संचालनासाठी आवश्यक तांत्रिक प्रणाली विकसित करण्यात येत आहे.

पर्यटकांच्या सोयीसाठी पाणबुडीत चार्जिंग सुविधा, डॉकिंग स्टेशन, नियंत्रण कक्ष, देखभाल केंद्र, संप्रेषण प्रणाली, बॅटरी व्यवस्थापन यंत्रणा आणि आपत्कालीन प्रतिसाद प्रणालीचा समावेश असणार आहे. समुद्रातील बदलत्या हवामानाचा आणि भरती-ओहोटीचा विचार करून आंतरराष्ट्रीय सुरक्षा मानकांनुसार या सुविधा विकसित केल्या जात आहेत.

## दाभोसा धबधब्यासमोरील काचेचा पूल पर्यटकांसाठी नवे आकर्षण

जव्हार तालुक्यातील निसर्गसौंदर्याने नटलेल्या दाभोसा धबधब्यावर उभारण्यात येत असलेला काचेचा पूल (स्कायवॉक) आता पर्यटकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. या प्रकल्पामुळे केवळ पर्यटनाला चालना मिळणार नसून ग्रामीण भागातील युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधीही निर्माण होणार आहेत. जिल्हा नियोजन समितीच्या पर्यटन विकास योजनेअंतर्गत सुमारे दोन कोटी रुपयांच्या निधीतून हा प्रकल्प साकारला जात आहे. पालघर जिल्ह्यातील अशा प्रकारचा हा पहिलाच उपक्रम असल्याने पर्यटकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

पावसाळ्यात दाभोसा धबधब्याचे रौद्र आणि मोहक रूप पाहण्यासाठी हजारो पर्यटक येथे भेट देतात. आता काचेच्या पुलामुळे पर्यटकांना उंचावरून धबधब्याचा विहंगम दृश्य अनुभवता येणार आहे. यामुळे पर्यटकांच्या मुक्कामात वाढण्याची आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पर्यटन तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकल्पांमुळे ग्रामीण पर्यटनाला बळ मिळते. स्थानिक संस्कृती, कला आणि खाद्यसंस्कृतीला बाजारपेठ उपलब्ध होते. दाभोसा स्कायवॉकमुळे जव्हार तालुक्याची पर्यटन ओळख अधिक भक्कम होऊन स्थानिक विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



## • महत्त्वाच्या बातम्या

## हॉटेल, होमस्टेसाठी 'स्टार' सक्ती रद्द; हेरिटेज पर्यटनाला गती



पर्यटन धोरण-2024 मधील दुरुस्त्यांद्वारे हॉटेल, होमस्टे, बेड अँड ब्रेकफास्ट आणि व्हॅकेशन रेंटल होम्स यांच्या व्याख्यांमध्ये बदल करून अनेक बंधनकारक अटी शिथिल केल्या आहेत. यामुळे ग्रामीण पर्यटन, फार्मस्टे, व्हिला, सुट्टीसाठी भाड्याने दिली जाणारी घरे, तसेच हेरिटेज पर्यटनाला चालना मिळण्याची शक्यता आहे.

नव्या शासन निर्णयानुसार, हॉटेल व्यवसायासाठी केंद्र सरकारच्या स्टार कॅटेगरी प्रमाणपत्राची सक्ती हटवण्यात आली आहे. यापूर्वी एक ते पाच स्टार श्रेणीतील निकष पूर्ण करून प्रमाणपत्र घेणे आवश्यक होते. आता पर्यटन मंत्रालयाने निश्चित केलेल्या आदरातिथ्य मानकांनुसार सुविधा व सेवा पुरविणारी, किमान दहा खोल्या आणि संलग्न स्नानगृहे असलेली निवास व्यवस्था हॉटेल म्हणून ग्राह्य धरली जाणार आहे. त्यामुळे लहान व मध्यम हॉटेल व्यावसायिकांना पर्यटन विभागाने घेतलेल्या निर्णयाने मोठा दिलासा मिळाला आहे.

## घोडबंदरच्या शिवसृष्टीतून स्वराज्याचा इतिहास जिवंत होणार - पर्यटन मंत्री शंभूराज देसाई

शिवसृष्टी प्रकल्पातून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, विचार आणि स्वराज्याची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचणार आहे. या प्रकल्पामुळे घोडबंदर किल्ल्याच्या परिसराचा विकास होऊन पर्यटनाला चालना मिळेल, असे प्रतिपादन पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केले.

मंत्रालयातील दालनात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या समवेत मिरा-भाईंदर, जि. ठाणे येथे उभारण्यात येणाऱ्या शिवसृष्टी प्रकल्पाच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव श्री. संजय खंदारे (भा.प्र.से.), महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. नीलेश र. गटणे (भा.प्र.से.), पर्यटन विभागाचे उपसचिव विजय पोवार, पर्यटन संचालनालयाचे संचालक श्री. मंगेश जोशी (भा.प्र.से.),, मिरा-भाईंदर महानगरपालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत शिवसृष्टी प्रकल्पाच्या विविध घटकांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रकल्पासाठी लागणारा शंभर टक्के निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्यामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



# • पावसाळ्यातील प्रसिद्ध पर्यटन स्थळे

## माळशेजघाट




महाराष्ट्रातील पावसाळा अनुभवण्यासाठी कोकण रेल्वेचा प्रवास जितका सुंदर वाटतो, तितकाच माळशेज घाटही मनाला भुरळ पाडतो. या दिवसांमध्ये माळशेज घाटात जाणे म्हणजे निसर्गाच्या पानावर उमटलेली एक कविता अनुभवण्यासारखे आहे. डोंगर-दऱ्यांमधून कोसळणारे धबधबे घाटात पांढऱ्याशुभ्र चादरीसारखे भासतात. तसेच या ठिकाणाजवळच असलेल्या पिंपळगाव जोगा धरणाच्या जलाशयामध्ये कधीकधी फ्लेमिंगो पक्ष्यांचे दर्शनही घडते. चहूबाजूंनी दाट धुक्यामध्ये हरवलेल्या माळशेज घाटाचे रूप न्याहाळताना मन प्रसन्न होते. जवळच असलेला हरिश्चंद्रगड अनुभवी गिर्यारोहकांना साद घालतो. तसेच फक्त पावसात उभे राहून जगण्याचा निखळ आनंद घेऊ इच्छिणाऱ्यांना हा घाट आपलेसे करतो.

## कोयनानगर

निवांत पर्यटन (Slow Tourism) या आधुनिक संकल्पनेचा पर्यटकांना परिचय होण्यापूर्वीच कोयना नगरमध्ये संथ आणि निवांत क्षण अनेक वर्षांपासून प्रत्यक्षात अनुभवता येत आहेत. कोयना धरणाच्या आधारे निर्माण झालेल्या विस्तीर्ण शिवसागर तलावाच्या शेजारी वसलेले सातारा जिल्ह्यातील हे ठिकाण पर्यावरण-संवेदनशील क्षेत्रात येते. हेच लक्षात घेऊन येथे जाणीवपूर्वक आणि गरजेनुसारच विकास मर्यादित ठेवण्यात आला आहे. जूनमध्ये पावसाचा जोर वाढत असताना येथील वनराईला नवा बहर येतो. दिवसागणिक जंगल अधिकच घनदाट रूप धारण करते. वासोटा किल्ल्यापर्यंत पोहोचण्यासाठी शिवसागर तलावामधून बोटीने प्रवास करण्याचा अनुभव म्हणजे निसर्गाचे एक अनोखे वरदान आहे. या प्रवासादरम्यान किल्ल्यापर्यंत पोहोचण्याची उत्सुकता आणखीनच वाढते.



## आंबोली



महाराष्ट्राच्या कोकण किनारपट्टीच्या दक्षिण टोकाला वसलेले आंबोली हे खूप सुंदर पण अजूनही पर्यटकांच्या नजरेआड असलेले थंड हवेचे ठिकाण आहे. आजच्या सोशल मीडियाच्या काळातही येथील धबधबे आणि प्रेक्षणीय ठिकाणे एका नवीन प्रवासाचा अनुभव देतात. आंबोली घाटात सह्याद्रीतील सर्वात जास्त पाऊस पडतो. येथील जंगलात अतिशय दुर्मिळ असा 'आंबोली बुश फ्रॉग' हा बेडूक आढळतो. निसर्गप्रेमी आणि वन्यजीव संशोधकांसाठी हे ठिकाण खऱ्या अर्थाने मुख्य आकर्षणाचे केंद्र आहे. जून महिन्याच्या सुरुवातीलाच संपूर्ण परिसरात पसरलेली दाट धुक्यांची चादर, छोटे-मोठे धबधबे आणि बेडकांचे एकाच सुरात ओरडणे पर्यटकांना एका वेगळ्याच दुनियेत घेऊन जाते. आंबोली म्हणजे महाराष्ट्रातील पावसाळ्याचे सर्वात सुंदर आणि देखणे रूप आहे.



MAHARASHTRA
TOURISM

MAHARASHTRA

www.maharashtratourism.gov.in | www.mahaatithi.org

**Follow us on:**

MaharashtraTourism diot@maharashtratourism.gov.in @maha_tourism

maharashtratourismofficial